KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

# मराठवाड्यातील निजामविरोधी शेतकरी असंतोष: एक चिकित्सा

**प्रा. कृष्णा नागवे**
सहायक प्राध्यापक,
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड जि. जालना.
Email- kanagwe@gmail.com

**प्रस्तावना:**

स्वतंत्र उपभोगण्याची आणि आपले हक्क प्राप्त करण्याची भावना हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या काळात शेतकऱ्यांनी जनआंदोलनात भाग घेऊन व्यक्त केली. निजामाच्या प्रशासकीय धोरणे आणि मध्यस्थ शोषणाच्या रचनेचा परिणाम म्हणून मुख्यात्वाने शेतकऱ्यांचा असंतोष वाढत गेला होता. लष्करी सामर्थ्यावर लोकांची आंदोलने किंवा सत्याग्रह दडपण्याचा प्रयत्न निजामाच्या शक्ती सामर्थ्याने सतत केला. त्यामुळे ग्रामीण भागातील कृषी कार्य करणाऱ्या समूहाने देखील निजाम विरोधी असंतोष जंगल सत्याग्रह, करोडगिरी नाक्यांच्या लुटीत सहकार्य, लेव्हीविरुद्ध आंदोलन इत्यादी माध्यमातून दाखवून दिला. शेतकरी लोक खूप काळापासून वेगवेगळ्या अन्यायाला सहन करत आले. पण आता त्यांच्या संयमाचा अंत झाला होता. त्यामुळे 1947 नंतर शेतकऱ्याच्या आंदोलनाचे स्वरूप जनआंदोलनामध्ये परिवर्तित झाले होते.

**मुख्य शब्द:** शेतकरी, मराठवाडा, शेतकरी असंतोष, हैदराबाद राज्य, महसूल, जहागीरदारी, जंगल सत्याग्रह, लेव्ही.

प्रथम निजामाच्या काळात शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आलेले होते. कारण निजामाचे राज्य नव्याने मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगणा या भागात स्थापित झाले होते. राज्याच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत कृषी असल्याने कृषीला वाढविणे ही तत्कालीन काळाची गरज देखील होती. 1724 मध्ये स्थापन झालेले हैदराबाद राज्य 225 वर्ष सातत्याने कृषी जीवनास प्रभावित करत राहिले. निजामाच्या राज्याचे स्वरूप सरंजामी असल्याने हैदराबादच्या निजामाच्या प्रशासनात निजाम हा मोठा राजा आणि त्याच्याखाली असणारे अनेक जागीरदार, वतनदार आणि मक्तेदार होते. अगदी पाटील कुलकर्णी हे देखील आपणाला आपल्या भागातील राजेच असल्यागत वागत होते. जातीव्यवस्था, अलुतेदारी-बलुतेदारी आणि सांस्कृतिक वर्चस्वाखाली ग्रामीण भागातील शेतकरी आणि जनसामान्य माणूस कृषीवर आधारित कार्य करून आपल्या जीवन जगण्याची धडपड सातत्याने करत होता. जहागीरदारी व्यवस्था शेतकरी शोषणामध्ये महत्त्वाची भूमिका निभावत होते. शेतकऱ्यांना प्रशासकीय व्यवस्थेकडून शोषणाचा बळी व्हावे लागले होते. निजामाच्या राज्यात 40 टक्के भूभागावर जहागीरदारी व्यवस्था होती. या भागातील प्रशासन जागीरदाराच्या लहरीप्रमाणे व मनमानी चालत होते. शेत महसूल अधिक घेण्यात आला. पायगा, सर्फेखास आणि मोकासा इत्यादीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लुटणारे अनेक मक्तेदार जागीरदारी व्यवस्थेने निर्माण केले होते. जे आपल्या भागातील प्रभावशाली व्यक्ती असल्याने त्यांचा रोष उडवून घेणे म्हणजे विनाकारण ग्रामीण जीवनामध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण करण्यासारखे होते. त्यामुळे तत्कालीन कालखंडातील शेतकऱ्यांनी आपल्यावर झालेले अन्याय निमूटपणे सहन केले. ते वाट पाहत होते अशा एखाद्या जन-आंदोलनाची ज्या आंदोलनात शेतकऱ्यांना सहभागी होता येईल. 1947 नंतरच्या कालखंडामध्ये शेतकऱ्यांच्या माध्यमातून हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या अनुषंगाने जी आंदोलने उभारण्यात आली त्यामध्ये शेतकऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. निजामाच्या दरबारात नियुक्ती मिळवून शेतकऱ्यांचे शोषण करणारे मध्यस्थ देखील समाजातील महत्त्वाचा घटक होते. 'निजामाच्या प्रशासनात नियुक्ती मिळावी, पदोन्नती किंवा लाभ मिळावे यासाठी सोने, चांदी

आणि जडजवाहीर यांचे नजराणे देत."[१] निजामाशी चांगले संबंध ठेवणाऱ्या जागीरदार, वतनदारांनी शेतकऱ्यांची पिळवणूक केली आणि याचा परिणाम म्हणून निजाम विरोधी असंतोष जागृत झाला. जहागीरदारांनंतर नंतर शेतकऱ्यांची न सांगता येणारी अडचण म्हणजे निसर्गाचा लहरीपणा होय. अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीला पूजलेला होता. शेतीत मिळणारे उत्पन्न अनिश्चित असतांनाच सारा वसुली कडकपणे आणि निर्दयपणे करण्यात येत. कधी कधी स्थानिक मक्तेदार किंवा जमीनदार यांच्या अन्यायाचा कहर निर्माण झाला तरी दाद कुणाकडे मागावी हा प्रश्न होता. लोकशाही मूल्यांना थारा न देण्याची किमया राजेशाहीत सहज होत असे. निसर्गाने साथ सोडली की शेतकऱ्याला वाली नव्हता. निजामाच्या तुटपुंज्या महसुली सुटीचा फायदा मराठवाडा विभागात फारच कमी झाला होता.

शेती हा एक व्यवसाय असल्याने नफा आणि तोटा सहाजिकच होता. शेतमालाच्या भावाचे मूल्यांकन केले की, आपणास कल्पना येते की अगदी दहा-दहा वर्षे मालाचे भाव कायम राहत आणि त्यामुळे शेतकरी जीवनावर शेतमालाचे भाव कमी राहिल्यामुळे विपरीत परिणाम होत असे. शेतीचा वाढता खर्च आणि शेतमालाचे घटते भाव यामुळे निजाम कालखंडामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनाची अतिशय वाईट अवस्था होती. शेतमालाच्या अस्थिर भावामुळे शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये अस्थिरता निर्माण झाली होती. धान्याच्या भाव वाढीचा फायदा हा मध्यस्थ आणि दलाल यांना होत होता. कारण शेतकरी आपला माल अधिक काळ साठवून ठेवू शकत नसे.एखाद्या राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवरील घटनेमुळे देखील शेतकरी जीवनावरती परिणाम होत असे. निजाम सरकारला फक्त शेतकऱ्यांकडून कर हवा होता. शेती सुधारणा करणे हे निजामी सरंजामशाही व्यवस्थेचे कार्य नाही असेच त्यांना वाटत होते. 1918 यावर्षी युद्ध संपल्यानंतर शेतमालाचे भाव अतिशय कडाडले आणि 1929 मध्ये आर्थिक महामंदी मुळे शेतमालाचे भाव खूप कमी झाल्याचे आपणास दिसते. या सर्वांचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या जीवनावर या बदलत्या अर्थव्यवस्थेचा सातत्याने परिणाम झाला. "1930 मध्ये जागतिक महामंदीच्या काळात शेतकऱ्यांच्या मालाचे भाव कमी होणे, दारिद्रता वाढणे आणि कर्जबाजारीपणा याचा परिणाम म्हणून सामाजिक जीवन शेतकऱ्यांना अस्थिरतेचे वाटू लागले."[२]

निजाम कालीन शेतकऱ्यांच्या उत्पन्न आणि खर्च यातील वाढत जाणारी तफावत हा मुद्दा देखील चिंतेचा विषय होता. शेतीसाठी लागणारा खर्च आणि त्यातून मिळणारे उत्पन्न यांच्या ताळमेळातून जीवन जगण्या इतपत भांडवल शिल्लक राहणे आवश्यक होते. प्रत्यक्ष शेतकऱ्यांना खूपच कमी भांडवल महसूल, कृषी खर्च देता राहत किंवा कधी कधी त्याच्या जगण्यासाठी देखील कर्जे खाजगी सावकाराकडून घेण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत होती. त्यामुळे एकंदरीतच शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांना जमीन गहाण ठेवण्याची वेळ येत होती. यावेळी असंतोष निर्माण होणे सहाजिकच होते.

| पिकाचे नाव | उत्पन्न (प्रति एकरी) | खर्च (प्रति एकरी) | निव्वळ उत्पन्न (प्रति एकरी) |
|---|---|---|---|
| ज्वारी | १०-२-६ | ६-१५-९ | ३-२-९ |
| गहू | १०-०१-३ | ७-३-९ | २-१३-६ |

https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Aurangabad%20District/ch8_details.html#1 retrieved from, date 08.03.24 [3]

वरील तक्त्याचे निरीक्षण केले की अगदी स्पष्टपणे लक्षात येते शेतकरी अन्नधान्य पिकांमध्ये ज्वारी हे पीक घेत असे गृहीत धरले तर प्रती एकरी १० रुपये उत्पन्न, ६ रुपये खर्च आणि ३ रुपये निव्वळ उत्पन्न मिळत. समजा १० एकर शेती असेल तर शेतकरी व्यक्ती ३० रुपयापर्यंत निव्वळ उत्पन्न मिळवत. एवढ्या उत्पन्नात आरोग्य समस्या, लग्न, धार्मिक विधी आणि कौटुंबिक गरजा यांची पूर्तता होणे अवघड बाब होती.

निजामकाळात शेतकऱ्यांकडून लेव्हीच्या माध्यमातून धान्य घेण्याची पद्धती होती. शेतकऱ्यांकडून गोळा केलेले धान्य सरकारी गोदामात साठविण्यात येत. आधीच महसुली वसुली आणि त्यांनतर लेव्ही यामुळे शेतकरी त्रस्त बनले. लेव्ही वसुली करतेवेळी निजामाच्या अधिकाऱ्यांनी कधी हा विचार केला नाही की, शेतकऱ्यांच्या घरात किती धन्य आहे. गोदामात धूळ खात पडलेले धान्य शेतकऱ्यांच्या मुला-बाळांच्या तोंडातील

घास हिसकावून घेतल्यागत होते. धान्य वसुलीचे कार्य एखाद्या व्यापाऱ्याला किवा व्यक्तीला देण्यात आले ते शेतकऱ्यांच्या घरातील धान्यसाठा पाहण्यापेक्षा धान्य वसुलीवर भर देत होते. या कारणाने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होणे साहजिकच होते. त्याचा परिणाम सरकारविरोधी वातावरण निर्मितीमध्ये झाला होता. “सरकारविरोधी नीतीचा एक भाग म्हणून सरकारने शेतकऱ्यांकडून वसूल केलेले धान्य सैनिकांनी लुटावे आणि गरिबांना वाटून द्यावे हे कार्य हाती घेण्यात आला होते.”[4]

निजाम सरकार विविध मार्गांनी आपले आर्थिक उत्पन्न वाढवीत होते. राज्याला सर्वाधिक उत्पन्न कृषीच्या माध्यमातून मिळत होते. त्याचप्रमणे अबकारी उत्पन्न हे सरकारच्या उत्पन्नाचे महत्वाचे साधन होते. गांजा, ताडी, अफू इत्यादीच्या माध्यमातून निजामाला अधिक महसूल मिळत. शेतकऱ्यांच्या बांधावर असलेली किंवा शेतात मध्ये असणारी सिंधी आणि ताडीची झाडे सरकारी मालकी असल्याचे मानण्यात येऊन ती मक्तेदारांना गुत्तेदारीने देण्यात यायची. शेतकऱ्यांना ह्या झाडांचा त्रास होता, उत्पन्न निजाम सरकार घेत होते. कृषी कार्य आणि मशागत करतांना शेतात या झाडांमुळे शेतकऱ्यांना अडचण होत. ही झाडे तोडण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नव्हता. “शेतकऱ्यांनी निजाम सरकारला विरोध म्हणून ताडीची आणि सिंधीची झाडे तोडून आपला निषेध व्यक्त केला होता. या सत्याग्रहात मराठवाड्यातील जवळपास सव्वालाख शिंदी, ताड, मोह व सागाची झाडे तोडण्यात आली.”[5]

**समारोप:**

अशाप्रकारे एकूणच निजाम सरकारची धोरणे आणि त्यांच्या संरजामी रचनेचा परिणाम म्हणून शेतकरी निजामविरोधी बनले होते. अधिक महसूल आणि महसुली अधिकारी लोकांचा जाच यामुळेही शेतकरी त्रस्त होता. असंतोष हा एका दिवसात निर्माण झालेला नव्हता. याची पार्श्वभूमी खूप आधीपासून निर्माण झाली होती. जंगल सत्याग्रहासारख्या आंदोलनातून शेतकरी लोकांचा राष्ट्रवाद दिसून आला होता. शिवाय अन्याय अधिक काळ केला जाऊ शकत नाही याचे देखील हा असंतोष एक उदाहरण होता. शेतकऱ्यांनी क्रांतिकारक आणि स्वातंत्र्य सैनिक यांच्यासोबत कार्य केल्याने हैद्राबाद मुक्तीसंग्रमाची पार्श्वभूमी आणि लढा तयार होऊ शकला होता. यातून हे सत्य सिध्द झाले की शेतकऱ्यांचा इतिहास आहे आणि तो लिहिला गेला पाहिजे.

**संदर्भ:**

1. K. Krushna swami Mudraj, Ansar Naqvi (Translater from urdu), The 30 years Political struggle of Hyderabad (1894-1967), Shri Krushna Swami Mudiral Memorial trust, Hyderabad, 2011, page No. 06
2. Venkuntham, Y. (2004). Studies in Socio-Economic and political History: Hyderabad State. Hyderabad: Prof. Y. Vaikuntham publishers, page No. 67.
3. https://gazetteers.maharashtra.gov.in/cultural.maharashtra.gov.in/english/gazetteer/Aurangabad%20District/ch8_details.html#1 retrieved from, date 08.03.24.
4. सूर्यवंशी उमाकांत, हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि मराठवाड्यातील दलितांचा सहभाग, बोधस प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००४, पृ. क्र. १४१.
5. साळुखे सतीश, हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि बीड जिल्हा, सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र, संस्कृती मंत्रालय, प्रथमावृत्ती, २०१५, नवी दिल्ली, पृ. क्र. ९२.